प्रेसनोट दि६/०१/१८    खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## ॲन्टी करप्शन मध्ये पोलीस अधिकारी असल्याचे बतावणी करुन फसवणूक करणा-यांना अटक

खडकी पोलीस स्टेशन कडील कर्मचारी सपोफौ लक्ष्मण बांगर यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, फिर्यादी यांना एक महिला ॲन्टी करप्शन मध्ये पोलीस अधिकारी आहे अशी बतावणी करुन ती त्यांच्याकडे येणार आहे अशी माहिती मिळाल्यानंतर सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडकी पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती शहानिशा करुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे महिला नामे मरसी जोएल फर्नांडिस वय ३६ रा सत्या रिव्हर अपार्टमेंट भाऊ पाटील रोड बोपोडी पुणे व सतीश रमेश जाधव रा कोहिनुर पॅलेस शिवराम नगर पिंपळे गुरव पुणे यांना बोपोडी याठिकाणी सापळा रचून ताब्यात घेवून तपास करता त्यांनी गुन्हा करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर महिला व इसम यांनी ॲन्टी करप्शनमध्ये अधिकारी आहोत असे खोटे सांगून खोटे ओळखपत्र दाखवून फिर्यादी सुधीर आल्हाट यांचेकडे असलेले महत्वाचे कागदपत्रे घेण्याचा प्रयत्न करुन त्यांची फसवणूक केली आहे. सदर अटक आरोपी यांना मा. न्यायालयाने ९ जाने. पर्यंत तपासकामी पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आलेली आहे.

सदर कामगिरी पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे, सहा. पोलीस आयुक्त श्री गणेश गावडे यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री लक्ष्मण बोराटे व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री अजित लकडे, तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक निलेश महाडिक, शिवाजी भोसले, मदन कांबळे व पोलीस कर्मचारी लक्ष्मण बांगर, किरण घुटे महिला पोलीस कर्मचारी किर्ती लोखंडे यांनी केलेली आहे.